**International Journal of Social Research and Development**
**www.socialsciencejournal.net**
**Online ISSN: 2664-8709**
**Received: 21-01-2026, Accepted: 20-02-2026, Published: 07-03-2026**
**Volume 8, Issue 1, 2026, Page No. 82-84**

# व्यावसायिक सामाजिक उत्तरदायित्वाचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान विश्लेषण

**प्रा. लिना सुनील पगारे**
सहायक प्राध्यापक, वाणिज्य विभाग, महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य, (स्वायत्त) महाविद्यालय, मालेगाव कॅम्प, नाशिक, महाराष्ट्र, भारत

**सारांश**
निती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. व्ही. आर. सुब्रमण्यम यांनी दिलेल्या अहवलानुसार भारत ही संपूर्ण जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनली आहे. गेल्या ५ वर्षांचा आढावा घेतला तर अनेक चढ उतार होताना आपल्याला बघायला मिळतात. जीडीपी वाढीचा दर जो कुठल्याही अर्थव्यवस्थेच्या प्रगतीचा निर्देशक असतो, तो ही गेल्यावर्षी ६.५% ते ६.६% यात निश्चितच सर्व व्यवसायांचे योगदान आहे. व्यवसाय हे समाजाचा अविभाज्य भाग आहे. आणि समजाच काहीतरी देणं आपण लागतो ही जबाबदारी या उद्योगांनी घेतली पाहिजे म्हणजे आपली व्यावसायिक सामाजिक जबाबदारी पार पाडली पाहिजे. भारतात असे अनेक व्यवसाय आहेत जे आपली सामाजिक उत्तरदायित्वाची रक्कम खर्च करून वेगवेगळ्या कल्याणकारी योजना राबवत आहेत. त्यात शिक्षण क्षेत्रातील खर्च लक्षणीय आहे आणि महणूनच या बाबत आपण या शोध निबंधामध्ये त्याचे विश्लेषण करणार आहोत.

**मुलशब्द:** पंचायती राज, लोकतान्त्रिक विकेन्द्रीकरण, स्थानीय प्रशासन, सूचना का अधिकारः, वित्तीय जवाबदेही

व्यावसायिक सामाजिक उत्तरदायित्वाची सुरुवात ही एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात पाहायला मिळते. १९५३ मध्ये हॉवर्ड बोवेन यांनी सर्वप्रथम या संकल्पनेचा विचार मंडला परंतु, भारतात अगदी प्राचीन काळापासून व्यावसायिक सामाजिक उत्तरदायित्वाच्या संकल्पनेची पाळेमुळे बघायला मिळतात. धर्म आणि सेवा या संकल्पनांमध्ये आपल्याला सहज लक्षात येते तसेच, महात्मा गांधीजींच्या विचारात ही सी. एस. आर. म्हणजेच व्यावसायिक सामाजिक जबाबदारी ची संकल्पना बघायला मिळते. भारतात कंपनी कायदा २०१३ च्या अंतर्गत सी. एस. आर.म्हणजेच व्यावसायिक सामाजिक उत्तरदायित्वाला कायदेशीर पाठबळ देण्यात आले आणि भारत हा सी. एस. आर. ला कायदेशीर पाठबळ देणारा पहिला आणि एकमेव देश बनला.

## व्याख्या

कंपनी कायद्याच्या कलम १३५(१) नुसार कोणतीही कंपनी ज्या कंपनीची निव्वळ संपत्ती ५०० कोटी किंवा त्यापेक्षा अधिक असेल; किंवा आर्थिक वर्षातील उलाढाल १००० कोटी किंवा त्यापेक्षा जास्त असेल; किंवा निव्वळ नफा ५ कोटी किंवा त्यापेक्षा जास्त असेल तर अशा कंपनीला आपल्या तीन वर्षाच्या सरासरी नफ्याच्या २ः इतकी रक्कम व्यावसायिक सामाजिक उत्तरदायित्वासाठी खर्च करावी लागेल.

## अभ्यासाची उद्दिष्टे

- व्यावसायिक सामाजिक उत्तरदायित्व महाराष्ट्रातील खर्चावर अभ्यास.
- व्यावसायिक सामाजिक उत्तरदायित्व महाराष्ट्रातील जिल्हानिहाय खर्चाचा अभ्यास.
- व्यावसायिक सामाजिक उत्तरदायित्व शिक्षणक्षेत्रातील योगदानाचा अभ्यास.

## संशोधन पद्धती

या अभ्यासासाठी आवश्यक असलेला डेटा दुय्यम डेटा आहे जो कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाच्या अधिकृत वेबसाइट्स, वृत्तपत्रातील लेख, जर्नल्स, संशोधन पत्रे इत्यादींसारख्या विविध स्रोतांमधून गोळा केला गेला आहे.

**तलिका १:** २०१९–२० ते २०२३–२४ या आर्थिक वर्षांमध्ये कंपन्यांनी सी.एस.आर. वर खर्च केलेली रक्कम (रु.कोटी मध्ये)

| Nature of Company | FY 2019-20 | | FY 2020-21 | | FY 2021-22 | | FY 2022-23 | | FY 2023-24 | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Total Cos. | Amount Spent | Total Cos. | Amount Spent | Total Cos. | Amount Spent | Total Cos. | Amount Spent | Total Cos. | Amount Spent |
| 1. | 2. | 3. | 4. | 5. | 6. | 7. | 8. | 9. | 10. | 11. |
| PSU | 483 | 5,310.12 | 448 | 4,486.27 | 400 | 4,407.17 | 437 | 4,112.08 | 374 | 4,773.17 |
| Non-PSU | 22,502 | 19,655.70 | 20,392 | 21,724.68 | 19,834 | 22,734.28 | 25,940 | 26,819.99 | 26,814 | 30,135.59 |
| Total | 22,985 | 24,965.82 | 20,840 | 26,210.95 | 20,234 | 27,141.45 | 26,377 | 30,932.07 | 27,188 | 34,908.75 |

## विश्लेषण

वरील तक्त्या नुसार आपल्याला सहज लक्षात येते की मागील पाच वर्षांपासून वेगवेगळ्या व्यवसाय संस्था या सी. एस. आर. वर खर्च करत असतात. पी. एस. यू. चा विचार केला तर सुरवातीला हा खर्च कमी होतांना दिसतो. परंतु २०२३–२४ या आर्थिक वर्षात पुन्हा वाढ होतांना दिसते. हा खर्च वेगवेगळ्या क्षेत्रात करता येत असतो जसे आरोग्य, शिक्षण, महिला व बालविकास, मूलभूत सुविधा ई. गोष्टींवर देशपातळीवर केला जातो. २०१९–२० ते २०२३–२४ या पाच वर्षांत देश पातळीवर सी. एस. आर. खर्च १,४४,१५६ कोटी रु. इतका झाला आहे. त्यात महाराष्ट्रात सर्वाधिक म्हणजेच जवळपास २३,६६६.६४ इतका खर्च झाला आहे.

**तालिका २:** २०१९–२० ते २०२३–२४ या आर्थिक वर्षांमध्ये महाराष्ट्रात सी.एस.आर. वर खर्च केलेली रक्कम (रु. कोटी मध्ये)

| राज्य | २०१९–२० | २०२०–२१ | २०२१–२२ | २०२२–२३ | २०२३–२४ |
|---|---|---|---|---|---|
| महाराष्ट्र | ३३५३.२४ | ३४६४.८१ | ५४०७.४ | ५७०५.५४ | ६०६५.६५ |

**संदर्भः** (http://www.csr.gov.in)


**तालिका २:** २०१६–२० ते २०२३–२४ या आर्थिक वर्षांमध्ये महाराष्ट्रात शिक्षण क्षेत्र सी.एस.आर. वर खर्च केलेली रक्कम (रु.कोटी मध्ये)

| क्षेत्र | २०१६–२० | २०२०–२१ | २०२१–२२ | २०२२–२३ | २०२३–२४ |
|---|---|---|---|---|---|
| शिक्षण | १४७७.५२ | १६६६.७६ | १६७८.४१ | २२६८.७८ | २८३४.७८ |

**संदर्भ:** (http://www.csr.gov.in)

**महाराष्ट्रातील जिल्हा निहाय सी एस आर वाटप व शिक्षणावरील खर्च**

| जिल्हा | पाच वर्षातील सी एस आर वाटप (र . कोटी मध्ये ) | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 2019–20 | | 2020–21 | | 2021–22 | | 2022–23 | | 2023–24 | |
| | एकूण | शिक्षण | एकूण | शिक्षण | एकूण | शिक्षण | एकूण | शिक्षण | एकूण | शिक्षण |
| मुंबई | 276.64 | 88 ~96.8 | 392.65 | 125~137.4 | 2980.22 | 953~1043 | 2861.07 | 915~1001 | 2814.46 | 900~985 |
| पुणे | 324.44 | 103~113.5 | 383.73 | 122~134.3 | 694.62 | 222~243 | 1096.34 | 350~383.7 | 1135.14 | 363~397.2 |
| ठाणे | 242.23 | 77~84.7 | 75.68 | 24~26.4 | 176.76 | 56~61.8 | 214.01 | 68~74.9 | 302.68 | 96~105.9 |
| रायगड | 33.73 | 10~11.8 | 141.54 | 45~49.5 | 272.04 | 87~95.2 | 326.29 | 104~114.2 | 243.61 | 77~85.2 |
| नागपूर | 54.2 | 17~18.9 | 37.84 | 12~13.2 | 189.8 | 60~66.4 | 172.86 | 55~60.5 | 160.63 | 51~56.2 |
| छत्रपती संभाजी नगर | 66.69 | 21~23.3 | 72.36 | 23~25.3 | 96.05 | 30~33.6 | 129.14 | 41~45.1 | 123.87 | 39~43.3 |
| बीड | 3.13 | 1~1.09 | 2.7 | 0.86~0.94 | 11.34 | 3~3.9 | 16.21 | 5~5.6 | 13.96 | 4~4.8 |
| परभणी | 0.15 | 0.04~0.05 | 0.39 | 0.12~0.13 | 1.38 | 0.44~0.48 | 3.64 | 1.16~1.27 | 3.4 | 1.08~1.19 |
| हिंगोली | 0.13 | 0.041~0.045 | 0.23 | 0.073~0.080 | 2.63 | 0.84~0.92 | 2.31 | 0.73~0.80 | 5.34 | 1.7~1.8 |
| बुलढाणा | 2.31 | 0.73~0.80 | 1.33 | 0.42~0.46 | 23.71 | 7.58~8.29 | 3.37 | 1.07~1.17 | 9.34 | 2.9~3.2 |
| अकोला | 1.5 | 0.48~0.52 | 0.54 | 0.17~0.18 | 2.43 | 0.77~0.85 | 2.59 | 0.82~0.90 | 2.32 | 0.74~0.81 |
| वाशिम | 0.48 | 0.15~0.16 | 0.1 | 0.032~0.035 | 7.02 | 2.24~2.45 | 5 | 1.6~1.75 | 1.84 | 0.58~0.64 |
| गोंदिया | 5.76 | 1.84~2.01 | 0.43 | 0.13~0.15 | 1.13 | 0.36~0.39 | 0.41 | 0.13~0.14 | 8.6 | 2.7~3.01 |
| यवतमाळ | 2.9 | 0.92~1.01 | 4 | 1.28~1.4 | 7.75 | 2.48~2.71 | 9.59 | 3.06~3.35 | 12.86 | 4.11~4.50 |




वरील अकड्यांवरून असे लक्षात येते की, शिक्षण या क्षेत्रावर सर्वाधिक खर्च (२३६६६.६४ पैकी ६६५६.२५ कोटी) झालेला दिसतो. ही रक्कम एकूण रकमेच्या ४१.५% इतकी आहे परंतु,ही संख्या मोठी दिसत असली तरी वास्तविक गरजेपेक्षा ती खूप कमी आहे. महाराष्ट्रातील शाळांमध्ये अजूनही पायाभूत सुविधांचा आभाव आहे, त्यात राज्यातील प्रत्येक जिल्ह्याची स्थिती ही वेगळी आहे. जिल्हा निहाय सी एस आर चे वाटप पाहिले तर प्रत्येक जिल्हा मिळालेल्या सी एस आर रकमेच्या सरासरी ३२ ते ३५% रक्कम शिक्षणावर खर्च करत असतो. त्यातही आंतरजिल्हा तफावत खूप मोठी आहे. मुंबई, पुणे व ठाणे यांसारख्या जिल्ह्यात सर्वाधिक खर्च होतांना आपल्याला दिसतो तर, अकोला,हिंगोली,वाशिम परभणी, बीड या जिल्ह्यात सर्वात कमी खर्च होतांना दिसतो. पुणे व मुंबई ला मिळालेला एकूण निधी हा उर्वरित सर्व जिल्ह्यांच्या एकत्रित निधीच्या दीडपटीपेक्षा जास्त आहे. या मागे राजकीय पार्श्वभूमी आणि उद्योजकांची मानसिकता कारणीभूत आहे.

**समस्या**

कलम १३५ पोटकलम ५ नुसार कंपन्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील आसपासच्या स्थानिक भागाला प्राधान्य देणे अपेक्षित आहे. त्याप्रमाणे होताना दिसत नाही कारण, मूळात सी एस आर कायदा केंद्र सरकारच्या अखत्यारित असल्यामुळे हा निधी वळवला जाऊ शकतो उदा. कोरोना काळात हा निधी पी एम केअर्स फंड कडे वळवला गेला तसेच,हर घर तिरंगा अशा अनेक ठिकाणी हा निधी गेल्यामुळे सुद्धा ज्या क्षेत्रात मूळात गरज आहे जसे, शिक्षण,मूलभूत सुविधा यांवर निधी खर्च झाला पाहिजे त्यावर होतांना दिसत नाही.

उद्योजकांना सी एस आर च्या माध्यमातून समाजात आपली चांगली प्रतिमा तयार करता येते. परंतू ते करत असतांनाही वास्तविक मदतीची गरज कुठे आहे याचा आढावा न घेता जिथे प्रसिद्धी व व्यवसायास व्याप्ती उपलब्ध होईल अशाच ठिकाणी उद्योजकांचा कल पाहायला मिळतो.

**निष्कर्ष**

सी. एस. आर. चा मूळ उद्देश हा व्यवसायांना त्यांचे सामाजिक उत्तरदायित्व पूर्ण करण्यासाठी माध्यम तयार करणे हा आहे परंतू शिक्षण क्षेत्राचा विचार करता पायाभूत सुविधांमध्ये चांगले बांधकाम,चित्रे,चांगले बेंच, इंटरॅक्टिव टीव्ही ई. समावेश आहे. राज्यातील १ लाखाहून अधिक शाळांसाठी जर सी एस आर मधून मिळणारी रक्कम विभागली तरी ती एकतर समान विभागली जात नाही आहे तसेच विभागलेली रक्कम ही वास्तविक गरजेपेक्षा

खूपच तुटपुंजी आहे. त्यामुळे सी. एस. आर. खर्चा बरोबर शिक्षणासाठी अर्थसंकल्पीय तरतूद वाढवणे गरजेचे आहे.

### संदर्भ सूची


1. Intent to Impact CSR in India- Principles, Practice and Compliance by Rajesh B. Vyas
2. CSR: Case studies from india by Dr. Bhaskar Chatterjee & Dr. Nayan Mitra
3. Bhupender and Vikas Kumar Joshiya (2012) "Issues and Challenges of Corporate social responsibility in India", IJIBF, Vol.2, No. 2, July-Dec.2012
4. Dr. Uday Teke & Dr. Rahul Binniwal (2026) "भारतातील कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारीचे आधुनिक प्रवाह",IJSRD,Vol.8.Issue 1,2026, Page No.30-32
5. (https://share.google/yeFWSs6kejT0Hxrj2)
6. (https://share.google/6zyM9EdUfhBBnlQI9)
7. (https://sansad.in/getFile/loksabhaquestions/annex/1711/AU3156.pdf?source=pqals - :~:text=(d):%20Under%20the%20Act,6)